नियमीत दिवाणी दावा क्र.१००/२०२३
सुधाकर वि. नारायण
निशाणी १३/ क सोबत

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ सुधाकर बापुराव बनसोड यांचा साक्षीपुरावा**

**मी शपथेवर निवेदन करतो की,**

**पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एन. बी. सोनवणे यांच्या मार्फत**

९. मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. आता मला ती तक्रार दाखवण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला नि.क्र.१५ देण्यात येते. दि.२२.११.२०२० रोजी पोलीस स्टेशन वडोदबाजार यांनी मला समन्स पत्र दिले होते. ते आता दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्याला नि.क्र.१६ देण्यात येते.

१०. दि.०४.११.२०२० रोजी मी तहसिलदार फुलंब्री यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. आता मला ती तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे व कार्यालयाची पोहच म्हणुन शिक्का आहे. त्याला नि.क्र.१७ देण्यात येते. दि.११.११.२०२० रोजी मी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. आता मला ती तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे व कार्यालयाची पोहच म्हणुन शिक्का आहे. त्याला नि.क्र.१८ देण्यात येते.

११. आता मला माझे दि.१७.०५.२००२ रोजीचे खरेदी खत दाखवण्यात आले. त्याला नि.क्र.१९ देण्यात येते.

सरतपास पुर्ण...

<u>साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस. एस. पाटील यांच्या मार्फत</u>

१२. माझे १०वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मी एक्स आर्मी हवलदार आहे. मी २४ वर्ष आर्मीमध्ये नोकरी केली व दि.३०.०४.२००९ रोजी सेवानिवृत्त झालो. निवृत्त नंतर मी पाथ्री या गावी एक वर्ष राहिलो. त्यानंतर छ.संभाजीनगर येथे आम्ही राहायला गेलो. पाथ्री गावी आमच्या नातेवाईकांच्या सुखदुखामध्ये येणे जाणे असते. माझया वडीलांचे संपुर्ण नाव बापुराव लक्ष्मण बनसोड असे आहे. माझया आईवडीलांचे निधन झालेले आहे. माझया वडीलांना मी धरुन पाच वारस आहोत, हे म्हणणे खरे आहे.

१३. गट नं.३२ मध्ये माझे वडील बापुराव यांचे स्वकष्टार्जीत जमीन होती, हे म्हणणे खरे आहे. बापुराव बनसोड यांच्या शेतजमीनीमध्ये आमच्या भावंडामध्ये वाटणी झालेली नाही, हे म्हणणे खरे आहे. दि.२६.०२.२०१४ चा पंचनामा मी पाहिलेला आहे. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला. हा तोच आहे. त्याला नि.क्र.२० देण्यात येते. पंचनाम्यामध्ये माझया मालकीचे व ताब्याचे व प्रतिवादीचे मालकीचे व ताब्याचे किती क्षेत्र आहे हा मजकुर संबंधीत अधिका-यांनी नमुद केला नाही, हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादीच्या ताब्यात गट नं.३२ मध्ये दि.२६.०२.२०१४ च्या पंचनाम्यामध्ये कोणतेही क्षेत्र नाही असा मजकुर लिहिलेला नाही, हे म्हणणे खरे आहे.

१४. माझी व प्रतिवादी यांची तंटामुक्ती कडे कोणत्याही प्रकारची तडजोड झालेली नाही, हे म्हणणे खरे आहे. तहसिलदार फुलंब्री, विभागीय आयुक्त, पोलीस अधिक्षक यांना दिलेल्या तक्रारीवरुन प्रतिवादी यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केलेली नाही. न्यायालयात दाखल केले जाणारे कागदपत्रे वाचुन सही करावी लागते हे मला माहित आहे. मी व प्रतिवादी यांनी नियमित दिवाणी दावा क्र.७०/२०२२ हरीकिसन

पाथ्रीकर व कासाबाई पाथ्रीकर यांच्याविरुध्द दाखल केला होता, हे म्हणणे खरे आहे.

प्रश्न - गट नं.३२ मध्ये माझी व प्रतिवादी यांची दोघांची मिळुन ३२ गुंठे जमीन आहे ?

उत्तर – मला माहित नाही. माझी २२ गुंठे जमीन आहे.

१५. आता मला नि.दि.दा.क्र.७०/२०२२ दाखवण्यात आला. त्याला नि.क्र.२१ देण्यात येते. सदर दाव्यामध्ये माझया मालकीची व प्रत्यक्ष ताब्यातील २२ गुंठे आणि प्रतिवादी यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताब्यातील १० गुंठे जमीन असा मजकुर नमुद केलेला आहे, हे म्हणणे खरे आहे.

१६. दि.०३.०६.२०२२ रोजी मी व प्रतिवादी जमीन मोजण्यासाठी गेलो होतो किंवा कसे हे माझया लक्षात नाही. त्यावेळी हरीकिसन यांनी मला व प्रतिवादी यांना काठीने मारहाण केली, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी याने हरीकिसन यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला त्यामध्ये मी साक्षीदार आहे. हरीकिसन यांच्या मुलाने माझया व प्रतिवादी यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली त्यामध्ये मी आरोपी आहे, हे म्हणणे खरे आहे. दोन्ही तक्रारी न्यायप्रविष्ट आहेत.

प्रश्न - दि.१४.१०.२०२३ रोजी प्रतिवादीने माझया मिळकतीवर ताबा केलेला आहे, याबाबत मी पोलीस स्टेशनला तक्रार दिली ?

उत्तर - नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मी तक्रार देण्यासाठी गेलो होतो, पण पोलीसांनी मला सल्ला दिला की, तुम्ही न्यायालयामध्ये जावुन दाद माघा.

१७. सदरचा सल्ला पोलीसांनी मला लिखित स्वरुपात दिला नाही, हे म्हणणे खरे आहे. दि.१४.१०.२०२३ रोजी मी पोलीस ठाण्यात प्रतिवादी यांच्याविरुध्द तक्रार

दयायला गेलो नाही, हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीतील १० आर जमीन प्रतिवादी याने कोणत्याही प्रकारचा ताबा केलेला नाही, हे म्हणणे खरे नाही. १० आर जमीन आजही माझया ताब्यात आहे, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादीची असलेली १० आर जमीन मला विकावी म्हणुन मी हा खोटा दावा दाखल केला, हे म्हणणे खरे नाही. माझया शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पुर्ण**.....**

फेरतपास नाही**...**

**फुलंब्री**
दि. १६/१२/२०२५.

**श्रवणोत्तर स्विकृत**
सदरचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2025.12.16 14:45:22 +0530

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री**